
प्र ६

अंधश्रद्धानिर्मूलन कार्यकर्त्यास शिक्षा व दंड

अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्त्यास शिक्षा व दंड

येथे एका अप्रिय पण पथ्यकारक घटनेविषयी इच्छेविरुद्ध लिहिणे भाग पडले आहे. आतापर्यंतच्या अनेक लेखांतून अं. श्र. नि. स. बद्दल प्रस्तुत लेखक जे म्हणत आला होता ते खरे असल्याचे कोर्टानेच शेवटी सिद्ध केले आहे. ते कसे याची कथा सांगितली पाहिजे.

'पैलतीर'चे संपादक प्रा. कृष्णा गुरव यांनी मे १९८८ मध्ये 'शोध भानामतीचा' हे शाम मानव यांचे पुस्तक नुकतेच बाजारात आल्याचे पुण्यात पाहिले. प्रस्तुत लेखकाचा भानामतीचा शोध घेण्याचा नेहमीच उद्योग चालू असल्यामुळे त्यांनी ते विकत घेतले व मला वाचावयास दिले.



मी त्या पुस्तकातील १२ पानावरचा मजकूर वाचून अवाक झालो. त्या पानावर पुण्याचे प्रसिद्ध वेदविज्ञान मंडळाचे संशोधक, लेखक व डॉक्टर श्री. प. वि. वर्तक यांचा पुढीलप्रमाणे उल्लेख आढळला, 'डॉ. वर्तक यांनी ५० भुते वश केली असून ती श्रीलंकेच्या कोबूरवर पाठविली व अशा अर्थाचा एक लेख वर्तकांनी मुंबईच्या 'श्री' साप्ताहिकात लिहिला आहे.' हे वाचल्यानंतर माझी शंभर टक्के खात्री झाली, की या अंधश्रद्धा निर्मूलनवाल्यांचा तोल पूर्णपणे सुटला असून त्यांना वेळेवर आवर घातला नाही, तर

ते कोणत्या थराला जातील हे सांगता यावयाचे नाही. म्हणून मी ताबडतोब डॉ. वर्तकांना पत्र लिहून सूचना केली, की त्यांची अशा तऱ्हेच्या उल्लेखाने बदनामी झाली असल्याने त्यांनी श्री. शाम मानववर खटला भरावा व त्यांना धडा शिकवावा. (डॉ. वर्तक कशा प्रकारचे गृहस्थ आहेत याची मला, त्यांचा पूर्वपरिचय असल्यामुळे पूर्ण खात्री होती म्हणूनच मी असे पत्र त्यांना लिहिले.) तथापि त्यांचे एक लेखी निवेदन माझ्याकडे असावे (कारण मला त्याचा माझ्या संकल्पित 'खरे विज्ञान व खोटे विज्ञान' या लेखात उपयोग करायचा होता.) म्हणून मी त्यांच्याकडे सदर पुस्तकातील पान बाराची एक झेरॉक्स प्रत काढून पाठविली व यातील उल्लेख खरा आहे का व आपण असा 'श्री' साप्ताहिकात लेख लिहिला आहे का, हे पत्राने कळवावे अशी विनंती केली. माझ्या २-७-८८ च्या पत्राला त्यांचे तातडीचे ४-७-८८ ला उत्तर आले व त्यात त्यांनी हे धादांत खोटे असल्याचे व असा लेख आपण 'श्री' वा कुठल्याही साप्ताहिकात लिहिला नसल्याचे प्रतिज्ञेवर सांगणारे निवेदन केले आणि नंतर माझ्या सूचनेप्रमाणे २६- ७-८८ रोजी पुण्याच्या फर्स्ट क्लास ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात व पुस्तकाच्या प्रकाशक व मुद्रकाविरुद्ध अब्रुनुकसानीचा फौजदारी व दिवाणी असे दोन्ही दावे केले.

कोर्टाने मानवांविरुद्ध काढलेले वारंट व समन्स स्वीकारण्यास मानवांनी एक वर्षापर्यंत टाळाटाळ केली. पण वर्तकांनी जिद्द सोडली नाही. एकदा श्री. मानव पुण्यातील एका कार्यक्रमाला आले असल्याचे कळताच वर्तक स्वतःकोर्टाच्या बेलिफल तेथे नेऊन त्यांना वारंट व समन्स लागू करवले. (समन्स टाळल्याबद्दल श्री. मानवना कोर्टाने ५०० रुपये दंड केला आहे.) यानंतर एक वर्षपर्यंत कोटांत हजर राहण्यास श्री. मानवनी टाळाटाळ केली. शेवटी हजर होऊन वकील दिला. पण स्वतःची तपासणी घेतली नाही. डॉ. वर्तकांनी स्वतःची तपासणी घेतली.



त्यांनी प्रस्तुत लेखकाची व प्रा. व. वि. अकोलकरांची या प्रकरणी साक्षही काढली. आम्ही दोघांनी साक्षी दिल्या व तपासण्याही घेतल्या. आम्ही वर्तकांना लिहिलेली पत्रे पुरावा

म्हणून कोर्टात सादर करण्यात आली. प्रस्तुत लेखकाचा 'खरे विज्ञान व खोटे विज्ञान' हा लेखही वर्तकांच्या वकिलांनी कोटांत हजर केला व संबंधित भाग वाचून दाखवला. तो लेख पुराव्याच्या कागदपत्रात समाविष्ट करण्यात आला. (जज्ज श्री. पाध्ये यांनी तो लेख पूर्ण वाचण्याचे आश्वासन दिले.)

या फौजदारी दाव्याचा निकाल २-४-१९९१ रोजी लागला. निकालात श्री. श्याम मानव, मुद्रक व प्रकाशक या तिघांनी डॉ. वर्तकांविषयी खोटा मजकूर प्रसिद्ध करून वर्तकांची बदनामी केल्याचा गुन्हा शाबीत झाला असल्याचे म्हटले असून त्याबद्दल या तिघांना कोर्टाने एक दिवस साधी कैद व शंभर रुपये दंड ठोठावला.

प्रथम श्रेणीचे ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट श्री. एस. वाय. पाध्ये यांनी आपल्या निकालपत्रात म्हटले आहे की, श्री. मानव यांनी या प्रकरणी फार मोठा गंभीर गुन्हा केला असून त्यांना कायद्यानुसार फार मोठी शिक्षा व दंड करावयास पाहिजे. पण ते करीत असलेले सामाजिक कार्य लक्षात घेऊन त्यांना मी सौम्य शिक्षा व दंड करीत आहे. या पुढे असा गुन्हा न करण्याची ताकीद त्यांनी दिली आहे. पुस्तकातील वर्तकांविषयीचा सर्व मजकूर काढून टाकण्याचा हुकूमही त्यांनी केला आहे. दिवाणी कोर्टाने निकाल सांगेपर्यंत पुस्तकाच्या सर्व प्रती डॉ. वर्तकांच्या ताब्यात ठेवण्याचा हुकूम केला आहे.

अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील एका प्रमुख कार्यकर्त्याला अशा कार्याच्या संदर्भातच कोर्टाकडून दंड व शिक्षा व्हावी, हे एक अघटित असून त्यामुळेच त्या घटनेला खास महत्त्व प्राप्त झाले आहे. हे महत्त्व दोन दृष्टीने आहे.

एक, असे कार्य करताना या कार्यकर्त्यांनी पाळावयाची पथ्ये व आचरावयाची नीती या दृष्टीने व

दुसरे, या कार्यकर्त्यांनी आपल्या शिकवणुकीला कितपत विज्ञानाचा आधार आहे,

या प्रश्नाची गंभीरपणे दखल घेण्याची गरज या दृष्टीने. या घटनेने पहिल्या प्रकारच्या दृष्टिकोनाचे महत्त्व त्यांना पटले असेल असे समजू. पण दुसऱ्या प्रकारच्या

दृष्टिकोनाचे महत्त्व त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक असून ते त्यांना अशा घटनेने पटेल असे वाटत नाही. कारण पहिल्या प्रकारचा दृष्टिकोन त्यांनी अमलात आणला नाही, तर त्या चुकीबद्दल दंड व शिक्षा करण्याची कायद्यात तरतूद आहे, तशी दुसऱ्या प्रकारचा दृष्टिकोन अंमलात आणला नाही तर दंड व शिक्षा करण्याची कायद्यात तरतूद नाही. त्यामुळे या दृष्टीने ते वाटेल ते लिहिण्यास व बोलण्यास मोकळेच आहेत. उदा. या लोकांनी राजस्थान विद्यापीठाने पुनर्जन्म खोटा आहे हे सिद्ध केल्याचे खोटेच पत्रक छापले आणि ते वाटले तर त्यामुळे राजस्थान विद्यापीठाची बदनामी होते का, याविषयीच दुमत होईल. मग तसा दावा दाखल करणे दूरच आणि मग विज्ञानाने अमुक खरे म्हणून सिद्ध केले, तमुक खोटे म्हणून सिद्ध केले असे ते खोटेच लिहू लागले, तर त्यांना कोण अडवणार ? आणि हे त्यांना माहीत असल्यामुळेच ते असे वाटेल ते खोटे लिहीत व बोलत असतात. वरील घटनेने हे लोक अधिक जबाबदारीने बोलतील व लिहितील अशी आशा करणे व्यर्थ आहे. जे लोक पुण्यासारख्या शहरातील प्रसिद्ध व्यक्तीबद्दल तिची बदनामी होईल अशी खोटी विधाने करायला मागेपुढे पाहत नाहीत, ते लोक विज्ञानाने अमुक सिद्ध केले आहे असे खोटेच विधान करायला मागेपुढे पाहतील काय? किंवा अमुक खेड्यात घडलेली भानामती खोटी असा मजकूर छापलेले पुस्तक प्रसिद्ध करायला त्यांना कशाची दिक्कत वाटेल? खरे तर डॉ. वर्तकांच्या या प्रकरणामुळे 'शोध भानामतीचा' हे संपूर्ण पुस्तकच खोटे असल्याचे ठरते असेच नाही, तर या लोकांचे कोणतेही म्हणणे खरे म्हणून स्वीकारणे धोक्याचे ठरते, हे सिद्ध झाले आहे.



प्राचार्य अद्वयानंद गळतगे यांच्या 'चार्वाकवाद आणि अध्यात्म' पुस्तकाचे सन २०१२ मधे पुण्यात विमोचन

टीप : श्री. मानवांना दंड व शिक्षा झाल्याची बातमी कोणालाही दिसणार नाही अशा ठिकाणी थोडक्यात छापून महाराष्ट्रातील मोठ्या वृत्तपत्रांनी आपल्या मनोवृत्तीचे पुन्हा एकदा दर्शन घडविले आहे. पण मानवांचा हा गुन्हा अशा स्वरूपाचा आहे की, बाँबे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५०, सेक्शन ५६ जी, या कलमानुसार फौजदारी गुन्हा शाबीत झालेल्या कोणत्याही व्यक्तीला सार्वजनिक कमिटीवर अगर ट्रस्टवर मेंबर म्हणून राहण्याचा अधिकार नाही. यापूर्वी तो एखाद्या कमिटीचा सदस्य असेल तर ते सदस्यत्व आपोआप रद्द होते. आणि म्हणून वृत्तपत्रांचे कर्तव्य आहे, की ही बातमी सर्वांच्या नजरेस आणून देण्यासाठी तिला प्राधान्य देणे.

टीप: (इ. स. २००० साली जोडलेली) डॉ. वर्तकांनी अब्रूनुकसानीच्या फौजदारी दाव्याबरोबरच मानवांविरुद्ध दुसरा दिवाणी दावा दाखल केला असल्याचा वरील लेखात उल्लेख आहे. त्या दाव्याची सुनावणी पहिल्या दाव्याच्या निकालानंतर सुरू झाली. वर्तकांनी ३०,००० रु. चा दावा केला होता. त्यासाठी त्यांनी माझी पुन्हा साक्ष काढली. ती साक्ष मी दिली. उलट तपासणीही घेतली. त्या दाव्याचा निकाल १९९८ साली लागून वर्तकांची मागणी कोर्टाने मान्य केली. त्यावर मानवांनी हायकोर्टात अपील केले आहे. पण ते हजर होत नाहीत. समन्स काढले तर त्यांचा पत्ता मिळत

नाही. दाव्याच्या निकालानुसार आजतागायत द. सा. द. शे. १२ टक्के व्याजदराने मानव वर्तकांना रु. ७३,२०० देणे लागतात. ही सरळ व्याजाने काढलेली रक्कम आहे. दंड नव्हे. दंड लेखात उल्लेख केल्याप्रमाणे पूर्वीच झाला आहे.